# ॥ अध्याय सहावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसद्गुरवे नमः ॥ गुरु शिष्यासी सांगती । ऐक बापा सावध चित्तीं । जगन्नाथांतील वृत्त यथास्थिति । भुक्तिमुक्तिदायक जें ॥ १ ॥ एक अलवणीबुवा ब्रह्मचारी । विद्वान् विहित शुद्धाचारी । तीर्थयात्रा करिती पादचारीं । मोठे तपस्वी असती ते ॥ २ ॥ घडले जयांसी चारी धाम । वेदोक्त कर्म सनातन धर्म । फलेच्छारहित निष्काम । परमार्थबुद्धि-विराजित ॥ ३ ॥ डाकोरनाथाचे ग्रामीं । अनुष्ठान करिती नित्य नेमीं । गीता भागवत नित्य प्रेमीं । पठण करिती उच्च स्वरें ॥ ४ ॥ पूर्वपुण्य पदरीं सद्भाग्य । अंगीं नित्य वसे तीव्र वैराग्य । निःस्पृही सत्पुरुष योग्य । संसारभोगविरहित जे ॥ ५ ॥ ते अलवणी साधुबुवा । जगन्नाथदर्शनीं सेवा । करित होते प्रेमें तेथवां । झालें वृत्त परिसावें ॥ ६ ॥ तीन मनुष्यें बुवांचे संगतीं । जगदीश्वरस्थानीं होती । अलवणी-बुवांची प्रकृति । अस्वस्थ झाली त्या समयीं ॥ ७ ॥ संगें असलेले तीन मानव । तयांसी झाला ज्वरोद्भव । म्हणती जगदीश्वर देव । हें काय संकट दाविलें ॥ ८ ॥ सप्त दिवसांत अन्नोदक । दुर्लभ झालें ग्रास एक । तृषा लागली फार भूक । व्याकुल जीव जाहला ॥ ९ ॥ त्या धर्मशाळेभीतरीं । हे पडले चौघे दुखणेकरी । कोणी आणून न देती सामग्री । भोजनाची तयांसी ॥ १० ॥ अथवा परिपक्व अन्न । मागतांही न देती आणून । चौघांसी उठवेना म्हणून । याचना करिती इतरांतें ॥ ११ ॥ लोक आपापल्या कामांत । श्रवणीं न घेती तयांची मात । परोपकारार्थ यातायात । सज्जनावीण कोण करी ॥ १२ ॥ यात्रार्थ जनांची दाटी । शास्त्रांच्या मोठ्या सांगती गोष्टी । परोपकार दया न पोटीं ।

काय चावटी उपयोगी ॥ १३ ॥ असूनि करंटे कृपण । उदार म्हणविती स्वयें आपण । कपर्दिकेस्तव तळमळपण । जीव व्याकुळ होतसे ॥ १४ ॥ औदार्य तें तरी दांभिक । आम्हांसी मोठे म्हणतील लोक । बाह्यरंग दाखवावया अनेक । शब्दसंकेत चालती ॥ १५ ॥ नीचसंगति वाटे गोड । साधूसि म्हणती लागलें वेड । स्ववर्णाश्रमधर्माची चाड । नसूनि रमती नीचासवें ॥ १६ ॥ वरीवरी संभावितपणा । अंतरीं भरल्या कपटखुणा । विद्वान् साधूंच्या सद्गुणा । पाहूनि मुख मुरडिती ॥ १७ ॥ आमुचा वंश मातापिता । आमुची कीर्ति उत्तमता । आमची वानिती जे योग्यता । देऊं दान तयां म्हणती ॥ १८ ॥ वडिलोपार्जित नीचवृत्ति । तेणें आलिया संपत्ति । आपणास मानिती भूपति । मोठे कपटी दांभिक ॥ १९ ॥ ऐसे दीर्घद्वेषी नीच । उन्मत्तपणें वदती आम्ही उच्च । ते काय करितील साच । परोपकार भूतदया ॥ २० ॥ असो तांदुळांतील खडे । न निवडितां दांत पडे । स्वादरहित अन्न भक्षणें जडे । रोग सत्वरें तया नरा ॥ २१ ॥ तैसे खरे साधुसंत । विद्वज्जन-समन्वित । निवडूनि वंदितां समस्त । कल्याणवंत जन होती ॥ २२ ॥ जाणूनि सदसद्विचार । शोधावें ज्ञान सारासार । वेदशास्त्रविहित हिततर । ध्यावें निरंतर सत्य तें ॥ २३ ॥ सत्य ते परमब्रह्मपुरुष । सत्य तेंचि आत्मसंतोष । सत्य स्वधर्मकर्म निर्दोष । सत्यचि तारक भवार्णवीं ॥ २४ ॥ हृदयीं परमात्म सत्य-स्वरूप । जाणती साधु अप्रकंप । ऐसे अलवणीबुवा समीप । असूनि कोणी नोळखिती ॥ २५ ॥ परी परमेश्वर तो दीनदयाळ । भक्तजनांचा करी सांभाळ । नुपेक्षी कदा जाश्वनीळ । जन चिरकाळ सेविती ॥ २६ ॥ तो प्रणतवत्सल प्रभु धांवे । हवें तें काम करी भक्तांसवें । निजजनांसी जीवेंभावें । संरक्षित सर्वदा ॥ २७ ॥ आकाशीं हिंडती पक्षी । निजबालकांसी सदा रक्षी । तैसा सर्वज्ञ सर्वसाक्षी । कदा नुपेक्षी दासासी ॥ २८ ॥ तेथें कोणी संस्थानीं । तेजःपुंज पुरुष सज्ञानी । वृद्धनृसिंहतीर्थ महामुनि । असती ऐसें लोक बोलती ॥ २९ ॥ अलवणीबुवांचें हृद्गत ।

जाणूनि वृद्धनृसिंह त्वरित । जेथें अलवणी होते निद्रिस्त । क्षुधादुःखें पीडित ॥ ३० ॥ तेथें येऊनि ठेले सन्मुख । कटीवरी हस्त साजिरे सुरेख । सुगंध भस्म लेपिलें देख । वदती 'अलख' शब्द ते ॥ ३१ ॥ अन्नोदकावांचूनि । ज्वरें भरली बहुत ग्लानि । शब्द निघेना मुखांतूनि । अलवणी आणि तिघां इतरांच्या ॥ ३२ ॥ ऐशी विलोकूनि अवस्था । दया उपजली जगन्नाथा । चौघाजणांचिया माथां । निजांघ्रिकमलें स्पर्शिती ॥ ३३ ॥ जगन्नाथचरणस्पर्शे । होतांचि चौघांचे मस्तकांस । खडबडूनि उठले त्या समयास । अलवणीबुवासहित ते ॥ ३४ ॥ जगन्नाथ-स्वामिचरणीं । साष्टांग नमिती तेचि क्षणीं । उभे राहिले जोडूनि पाणि । अंतरीं सद्गद होउनी ॥ ३५ ॥ गीर्वाण भाषेंत स्तवन । करिती अपार चौघेजण । साक्षात्पूर्णब्रह्म आपण । 'अवतारिक पुरुष' आहां ॥ ३६ ॥ दर्शन होतांचि आपलें । आमचें शरीर आरोग्य झालें । ऐसें कोठें न विलोकिलें । अपूर्व समर्थ महिमा हा ॥ ३७ ॥ हे भगवान् जगदीश्वरा । वृद्धनृसिंहपरात्परा । अवधूत श्रीमद्गुरुवरा । सर्वांतरनिवासी ॥ ३८ ॥ प्रत्यक्ष जगन्नाथस्वामी । दत्तदिगंबर स्मर्तृगामी । दीनजनार्ति-सकल प्रशमी । करुणाकंद पातले ॥ ३९ ॥ न पाचारितां सहज गमन । यशस्वी झालें सुदर्शन । भक्ताभीष्टप्रद महान् । शांताकार सद्गुरु ॥ ४० ॥ आजि पूर्ण भाग्योदय । देखिले भवतारक पाय । जे अत्यंत दुर्लभ अनेक उपाय । करितां प्राप्त योग्यांतें ॥ ४१ ॥ अवर्णनीय धन्य दिवस । भक्तजन-मानसनिवास । जगन्नायक श्रीमत्परमहंस । गुरुवतंस विलोकिले ॥ ४२ ॥ श्रद्धाभक्तिसमन्वित । अलवणी जोडूनि हस्त । परमादरें विनवित । जगन्नाथस्वामीतें ॥ ४३ ॥ आपलें कोणतें असे स्थान । वास्तव्य कोठें स्नान भोजन । होऊनियां प्रसन्न-वदन । निवेदन करावें ॥ ४४ ॥ हांसूनि वदती परमहंस । "विश्वीं आमुचा अखंड वास । विश्वाधिष्ठान हेंचि खास । अभिन्न स्थान आमुचें ॥ ४५ ॥ तथापि तुम्हांसि व्हावें श्रुत । यदर्थ सांगूं यथार्थ विहित । आमुचें स्थान सह्याद्रिपर्वत । आणि गिरनार पर्वत जाणावें ॥ ४६ ॥

काशीक्षेत्र मातापुर । करवीर पांचाळेश्वर नगर । कुरवपुर औदुंबर । करंजनगर इत्यादि ॥ ४७ ॥ नृसिंहवाडी गाणगापुर । कुरुक्षेत्र हरिद्वार । हिमाचल आणि रामेश्वर । द्वारका नगरी विख्यात ॥ ४८ ॥ विज्ञान नित्य गंगास्नान । अद्वैत परमामृत प्राशन । तुंगभद्रा प्रवरापान । भीक्षाटन सर्वत्र ॥ ४९ ॥ अबु श्रीगिरि अनेक । मेरुपर्वत गिरिकर्णिक । अंबा-काली-सरस्वत्यादिक । अनंत स्थानें आमुचीं ॥ ५० ॥ अष्टविनायक वक्रतुंड । ब्रह्मकपाट केदारकुंड । आमचें स्थान पिंड ब्रह्मांड । द्वादश ज्योतिर्लिंगादि ॥ ५१ ॥ तीर्थ-क्षेत्र-देव-संस्थान अखिल । संपूर्ण आमुचें निजस्थल । सर्वत्र व्यापक निर्मल । चिरकाल भरलों स्वतःसिद्ध" ॥ ५२ ॥ वृद्ध नृसिंहसरस्वती । ऐसें अलवणीबुवाप्रति । निजरंगप्रेमें बोधिती । स्वात्मप्रतीती दृढ व्हाया ॥ ५३ ॥ अवघा भरला जगन्नाथ । श्रीगुरुनृसिंहस्वामी समर्थ । दर्शनें स्मरणें सकलानर्थ । नष्ट होती तात्काल ॥ ५४ ॥ ऐसें ऐकूनि यतिभाषण । अलवणीबुवांनीं धरिले चरण । वारंवार घालिती लोटांगण । नृसिंहनारायणपदीं ॥ ५५ ॥ देवाधिदेवा परमहंसा । अविद्यासंसारतम-विध्वंसा । शुद्ध निरंजन परमपुंसा । उपनिषद्-रहस्य आपण ॥ ५६ ॥ मनोवाचा-अगोचर । विश्वव्यापक स्थिरचर । चैतन्यस्वरूप चराचर । तेंचि साकार जाहलें ॥ ५७ ॥ नवसें सायासें दुर्लभ । तोचि प्रत्यक्ष झाला लाभ । आपल्या कृपें सर्व सुलभ । रमावल्लभा होय तें ॥ ५८ ॥ श्रीमद्गुरु वृद्धनृसिंहतीर्थ । आपणचि स्वामी जगन्नाथ । ऐक्यस्वरूप ज्ञानयोग तत्त्वार्थ । झालों कृतार्थ दर्शनें ॥ ५९ ॥ अलवणीबुवा प्रार्थिती ऐसें । तेधवां वृत्त घडलें कैसें । श्रोतीं परिसावें अनायासें । विश्वंभरचरित्र तें ॥ ६० ॥ सुंदर एक गृह विशाल । तेथेंचि शोभिवंत निर्मल । उत्तम सुगंध रुचिकर जल । स्वच्छपात्रीं भरलें असे ॥ ६१ ॥ रंगवल्लयांचा अति थाट । बसाया मांडिले चार पाट । पुष्पलतिका घनदाट । चित्रविचित्र अचाट त्या ॥ ६२ ॥ चटण्या कोशिंबिरी लवण । रसभरित शाका द्विगुण । पंचामृत लोणचीं मृदु कठिण । पापड कुरवडियादिक ॥ ६३ ॥ बारिक

शाल्योदन सुवासिक । वरी पिंवळें वर्ण सम्यक् । सुंदर मधुर पकान्नें अनेक । लाडू मोदक वाढिले ॥ ६४ ॥ दधि क्षीर सुगंध शुद्ध घृत । बहुविध क्षिप्रा विलसत । आर्द्रक जंबीर आर्द्रकोषणयुत । रंभाफलादिक भरलेले ॥ ६५ ॥ कथिका नाना रसादिक । रुचिकर अपूप वटक । लेह्य पेय चोष्य खाद्यादिक । पदार्थ कटु आम्ल रसिक ॥ ६६ ॥ शुद्धपात्रीं रसभरित । विविध पदार्थ मांडिले बहुत । सुवासिक स्वच्छ जलपूरित । सुंदर पात्रें ठेविलीं ॥ ६७ ॥ मुखवासार्थ पूगीफल । सह त्रयोदशगुणीतांबूल । हिरण्यदक्षिणा सोज्वल । शोभिवंत स्थानीं ठेविली ॥ ६८ ॥ वारावयासी व्यजन चामर । उभे ठाकले सेवक तत्पर । चौघेजण झालेले क्षुधातुर । त्यांसी समर्थ सांगती ॥ ६९ ॥ उठा सत्वर भोजनासी । कारण नसे विलंबासी । सर्वसिद्ध पात्रीं निश्चयेंसीं । घ्या हो बसूनि प्राणाहुति ॥ ७० ॥ तंव ते चौघे तिकडे पहाती । सर्वसिद्ध पात्रें यथास्थिति । अद्भुत आश्चर्य मनीं मानिती । म्हणती केवल ईश्वर हे ॥ ७१ ॥ मग चौघे भोजना बैसले । आतृप्त यथास्थित जेविले । मुखशुद्ध्यर्थ तांबूल भक्षिले । आनंद वर्तला त्या स्थलीं ॥ ७२ ॥ तेथें असलेले सर्वलोक । पहाती हें विलक्षण कौतुक । म्हणती हे प्रत्यक्ष जगन्नायक । विश्वव्यापक परमेश्वर ॥ ७३ ॥ सप्त दिवसांचे उपोषित । चौघे अन्नोदकरहित । होते व्याप्त ज्वरदूषित । क्लेश भोगितां पाहिले ॥ ७४ ॥ लोक म्हणती अकस्मात् । कोठूनि आले न कळत । यांच्या चरणस्पर्शें क्षणांत । आरोग्य झालें चौघांसी ॥ ७५ ॥ क्षणांत अद्भुत नवल वर्तलें । उत्तम सुशोभित स्थान निर्मिलें । नानापकान्नपूरित पात्रीं देखिले । चौघे जेविले यथेच्छ ॥ ७६ ॥ घेतली तांबूलसहित दक्षिणा । सेवक वारिती चामर विंझणा । तृप्ति आरोग्यता चौघांजणा । लाधली एके क्षणांत ॥ ७७ ॥ अघटित परमेश्वरी लीला । दाविती दयार्द्र जनांला । अतर्क्य अगम्य ब्रह्मादिकांला । ते आजि डोळां पाहिली ॥ ७८ ॥ अवघे लोक लोटांगणा । प्रेमें घालिती प्रदक्षिणा । जगन्नाथ स्वामिचरणां । आलिंगिती आनंदें ॥ ७९ ॥ वदती लोक शरणागत । जगन्नाथ

स्वरूपानंत । उद्धरावे दुष्ट पतित । अपराध क्षमा करूनियां ॥ ८० ॥ आपण साक्षात् आहां प्रभु । पूर्णब्रह्म सनातन विभु । परमेष्ठी नारायण शंभु । अखंड कल्याणकारक ॥ ८१ ॥ पदरीं नसतां पूर्वपुण्य । सर्वचि आमचें वैगुण्य । भगवान् परमात्मा निस्त्रैगुण्य । ज्ञाननिपुण आहां कीं ॥ ८२ ॥ आम्ही येथें आलों पुण्यास्तव । परी अंतरीं नुपजे दयाभाव । परोपकाराचा अभाव । सर्वथैव जाहला ॥ ८३ ॥ पीडित दीनांसि अन्नोदक । दिधलें नाहीं ग्रास एक । तीर्थयात्रा देव-प्रदर्शन लोक । करितों दांभिक आम्ही ते ॥ ८४ ॥ त्यांत एक जन्मांध ब्राह्मण । वेदवेत्ता शास्त्रनिपुण । कर्मधर्मनिरत सात्त्विक जाण । भावें बोलत समर्था ॥ ८५ ॥ म्हणे अहो नारायणा । जगदीश्वराख्य निर्गुणा । योगेश्वराधीश जगत्कारणा । विश्वव्यापका गुरुवर्या ॥ ८६ ॥ मनीषा उपजली मानसीं । नयनीं पहावें आपणांसी । पूर्ण व्हावी कृपा मज दिनासीं । अहो हृषीकेशी उद्धरावें ॥ ८७ ॥ आपली कृपादृष्टि होतां । सर्वार्थ साध्य होय तत्त्वतां । अघटित ऐकिलें प्रत्यक्ष आतां । चौघे निरामय जाहले ॥ ८८ ॥ 'कर्तुमकर्तुमन्यथा'। जगदुत्पत्ति-स्थिति-संहरिता । जगत्प्राण अत्युदार दाता । जगन्नाथा आपण ॥ ८९ ॥ सफल करा जी मनोरथ । द्यावें दर्शन दीनानाथ । नातरी देह त्यागितों शपथ । सत्य आपणांसमक्ष ॥ ९० ॥ पाहूनि दृढतर निश्चय । कळवळले पुरुषोत्तमराय । पुढें प्रवर्तलें नवल काय । श्रोतीं सादर परिसावें ॥ ९१ ॥ स्वकंठांतील सुपुष्पहार । झुगारिला निजकरें सत्वर । जन्मांधाचिये अंगावर । सहज पडिला तेधवां ॥ ९२ ॥ पंडितें जाणूनि महाप्रसाद । वंदिला मस्तकीं अविषाद । नेत्रांसी स्पर्शितां विशद । उघडले नेत्र तयाचे ॥ ९३ ॥ नृसिंहतीर्थ इतुक्यांत । कटीवर ठेवूनि द्वयहस्त । उभे ठाकले दत्तावधूत । जन समस्त देखती ते ॥ ९४ ॥ पंडित वदे जी परमहंस सद्गुरु । कामधेनु चिंतामणि कल्पतरु । उपमा न साजे मैलागरु । क्षीरसागरादि आपणां ॥ ९५ ॥ लोह-परिसाचा दृष्टान्त । सुवर्ण एकदेशी न शोभत । सर्वज्ञ सर्वचिदपराजित ।

गुणातीत गुरुराय जो ॥ ९६ ॥ देहेंद्रियांत व्यापक सर्वेश्वर । असून अस्पर्श इंद्रियादि विकार । सर्वभूतनिवासी धुरंधर । कार्यकारणरहित तूं ॥ ९७ ॥ अविद्यामाया-व्यतिरिक्त । परी अज्ञानदृष्टीसी मायायुक्त । अव्यक्त असतां दिसे व्यक्त । उपाधि-निर्मुक्त विराजे ॥ ९८ ॥ वेदवेदांतप्रतिपाद्य । प्रत्यगात्मा ब्रह्म स्वसंवेद्य । देशकालवस्तु-अपरिच्छेद्य । जगद्वंद्य जगद्गुरु ॥ ९९ ॥ पुष्पमाला नेत्रीं फिरवितां । दिसूं लागलें दृश्य आतां । जेवीं निद्रेंतून जागृत होतां । अवघे दिसती पदार्थ ते ॥ १०० ॥ देवद्विजसाधुजन-विरोध । केलीं पूर्वजन्मीं पापें अगाध । त्यायोगें भोगिलीं दुःखें विविध । उपजलों गर्भांध इहजन्मीं ॥ १ ॥ पुण्यांश होता कांहीं पदरीं । यात्रेसी पातलों येथवरी । मी दीन हीन पंगु भिकारी । परंतु ईश्वरानुग्रह लाधला ॥ २ ॥ श्रीमन्नृसिंह जगदात्ममूर्ति । ज्याचेनि स्फुरे सत्तास्फूर्ति । मीं गर्भांधानें परब्रह्मज्योति । स्पष्ट नेत्रीं पाहिली ॥ ३ ॥ सुप्रसन्नवदन अति निर्मल । सर्वत्र व्यापला सुगंध परिमल । सुशोभित चरणरक्त कोमल । वंदितां भवजाल नुरेचि ॥ ४ ॥ अनंत जन्मींचें सर्व पातक । विदग्ध झालें अविद्यात्मक । डोळां देखिलें अद्वितीय एक । सच्चिदानंदरूप सद्गुरु ॥ ५ ॥ भाग्य उदयासी पावलें । जोडिलीं आजि श्रीगुरुपाउलें । गर्भांधासी नेत्र दिधले । अद्भुत वर्तलें चरित्र ॥ ६ ॥ धाता यथा जें जें निर्मित । न्यूनाधिक्य मिथ्याभूत । महत्पुरुषावीण अघटित । करी जगतीं अन्य कोण ॥ ७ ॥ धन्य धन्य हा जगन्नाथ-मेळा । अघटित अपार गुरुलीला । परमपूज्य त्रैलोक्यपाला । डोळां देखिलें गर्भांधें ॥ ८ ॥ ब्रह्मादिकांसी न लागे अंत । मुनि योगी हृदयीं नित्य चिंतित । ध्याती जया सेवकजन भक्त । तो जगन्नाथीं भेटला ॥ ९ ॥ ज्याचें सदुर्लभ चरणदर्शन । जयाकरितां वेदोक्त धर्माचरण । करिती हरिगुरु-भक्तिपरायण । तो नारायण संतुष्टला ॥ ११० ॥ यापरी नृसिंहस्वामी जगत्पाळें । चौघां दुर्बळां आरोग्य देऊनि

तृप्त केलें । तैसेंच गर्भांधासी नेत्र दिधले । जगन्नाथ-मेळीं सहज ॥ ११ ॥ अलवणीबुवा सेवकांसह । आरोग्य-तृप्त झाले सुखावह । जगन्नाथ-प्रसादासी दुराग्रह । विटाळ सहसा मानूं नये ॥ १२ ॥ जगन्नाथ-प्रसाद प्रशस्त । म्हणूनि लोक पसरिती हस्त । अलवणीबुवास अपरिमित । नृसिंहसरस्वती प्रबोधिती ॥ १३ ॥ मग अलवणी करिती विज्ञापना । विश्वात्मा प्रभु जगज्जीवना । द्यावें आम्हां पुनर्दर्शना । दयाघना गुरुवर्या ॥ १४ ॥ श्रीगुरु वदती प्रज्ञापुराप्रति । होईल पुढें वास्तव्य प्रख्याति । भेटी होईल सहजस्थिति । निःसंशय असावें ॥ १५ ॥ वदे नेत्र आलेला पंडित । निजसेवेंत ठेवा अखंडित । अनायासें दंडकमंडलुमंडित । गुरु न धुंडितां लाभले ॥ १६ ॥; तंव तेथें वृद्ध शूद्र एक । दारिद्र्यव्याप्त परमभाविक । येऊनियां श्रीगुरुसन्मुख । साष्टांग दंडवत करीतसे ॥ १७ ॥ करद्वय जोडूनि प्रार्थना करी । म्हणे आपण देव अवतारी । आठ दिवस झाले मदीय स्त्री । चुकली कोठें दिसेना ॥ १८ ॥ यात्रेंत धुंडितां थकलों । स्त्रीसंसारसुखासी मुकलों । तान्ह्या बालकासी रक्षितां सुकलों । विकलों जैसा चाकर ॥ १९ ॥ ऐकूनि समर्थ कथिती त्यासी । "मरणद्वारीं बैसलासी । अद्यापवरी वासना मानसीं । थेरड्या तिळही लाज नसे ॥ १२० ॥ ऐशीं वर्षांचें वृद्धवय । शिथिल झाले सर्वावयव । संनिध पातला मृत्यु-समय । तथापि कामवासना उरलीसे ॥ २१ ॥ आतां कैसा मनोजय । केव्हां व्हावा वासनाक्षय । कदा जिंकावें विषयेंद्रिय । वृद्धा विचार करीं रे ॥ २२ ॥ तूं कोण कैंचा कोठून । आलासि पुढें कोठें गमन । प्रस्तुत शूद्रदेह-धारी असून । वृथाभिमान बाळगिसी ॥ २३ ॥ दृश्य जगत्कर्ता कोण । याचें कोणतें उपादान कारण । तूं दृश्य जडदेह नव्हेसि आपण । करीं विचार एतादृश ॥ २४ ॥ विषयभ्रांतीनें भुललासी । पूर्वींचा तूं तेली असती । दास आमुचा असूनि मानसीं । ओळख कशी पटेना " ॥ २५ ॥ मग समर्थ सांगती सेवकांसी । भस्म लावावें याचे कपाळासी ।

तेणें होईल स्मृति मानसीं । अंतसमयासी उपयोगी ॥ २६ ॥ भस्म स्पर्शितांचि भालीं । पूर्वजन्म-स्मृति उद्भवली । धांवूनि लागला चरणकमलीं । नृसिंहसरस्वती-गुरूच्या ॥ २७ ॥ म्हणे "मी जातीचा तेली आपा । मज कां अव्हेरिलें मायबापा । वश झालों संसार-खटाटोपा । त्रिविधतापें गांजलों ॥ २८ ॥ सोडवा प्रपंच-परिग्रहसंग । ठेवा निजपदकमलीं अभंग । नांदवा ब्रह्मात्मसुखीं निःसंग । निजरंगीं मेळवा करूणार्णवा" ॥ २९ ॥ वृद्धाची प्रिय स्त्री त्या कालीं । काय आहे तें पहावया आली । पतीस देखूनि आनंदली । बालें घेतलीं कटीवरी ॥ १३० ॥ वारंवार निजपतीचे कंठीं । प्रेमभरें घालीत मिठी । अनिवार मायाप्रपंचगांठी । लोक पहाती कौतुक ॥ ३१ ॥ वृद्ध तेली स्त्रीस म्हणे ऐक । श्रीगुरुसमर्थपदीं ठेवीं मस्तक । ईश्वरावतार जगदोद्धारक । आमचा पालक सर्वस्वीं ॥ ३२ ॥ मग ती करितसे साष्टांग नमन । म्हणे स्वामीचरित्र अपार गहन । दर्शनें झालें परम पावन । पूर्वजन्मज्ञान उपजलें ॥ ३३ ॥ उभयतांही सद्गुरुपदीं लोळती । चरणारविंदीं ठेवा म्हणती । गुरुपदवियोग नसावा अंतीं । स्वस्वरूपीं मेळवा ॥ ३४ ॥ नृसिंहमुनि वदती वचना । तुमची पूर्ण होईल शुभकामना । आशीर्वाद देऊनि सर्वजनां । अंतर्धान पावले ॥ ३५ ॥ आश्चर्य वाटलें सकळांस । म्हणती साक्षात् पूर्णब्रह्म परमहंस । मग सर्वजन जाती स्वसदनास । सद्गुरुपदांतें चिंतूनि ॥ ३६ ॥ ते अलवणीबुवा बडोद्यांत । निरुपाधिक बालपिशाचवत् । स्वेच्छें राहिले दिवस बहुत । लोककल्याणाकारणें ॥ ३७ ॥ नव्हते बुवा लवण भक्षित । म्हणूनि 'अलवणी' नाम विख्यात । त्यांनींच हें श्रीगुरुवृत्त । निवेदिलें आम्हांसी ॥ ३८ ॥ जाणूनि पूर्ण भरंवशाचें वृत्त । सत्यपणें ग्रंथीं केलें ग्रथित । नव्हे किंचित् स्वकपोलकल्पित । सत्यार्थ वदविती दत्तगुरु ॥ ३९ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदशास्त्रपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठवामनविरचित । षष्ठाध्याय गोड हा ॥ १४० ॥

इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे षष्ठोऽध्यायः समाप्तः ॥ ६ ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥